FOTO CIRCLE SOCIETY
TOGETHER WE PROGRESS

**दिनांक १६ सप्टेंबर २०१४,**

## ठाणे महापौर छायाचित्र पुरस्कार स्पर्धा व प्रदर्शन

### ठाणे महानगरपालिका आणि फोटो सर्कल सोसायटीतर्फे

# आविष्कार २०१४ चे आयोजन

मागील १५ वर्षाप्रमाणे या वर्षीही हौशी प्रकाशचित्रकारांसाठी ठाणे महानगरपालिका व फोटो सर्कल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ ते ९ नोव्हेंबर २०१४ या कालावधीमध्ये ठाणे कलाभवन, कापूरबावडी जंक्शन, बीग बझार शेजारी, ठाणे (प.) येथे ठाणे महापौर छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शन '**आविष्कार २०१४**' चे आयोजन करण्यात आले आहे.

गेली १५ वर्षे ठाणे महानगरपालिकेच्या सहकार्याने ठाणे व महाराष्ट्रातील हौशी व व्यावसायिक प्रकाशचित्रकारांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. स्पर्धेचे हे १६ वे वर्ष असून ही स्पर्धा ठाणे तसेच महाराष्ट्रातील सर्व प्रकाशचित्रकारांसाठी खुली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेचे विषय १) मोनोक्रोम (Monochrome) २) रंग (Colour) ३) निसर्ग / जंगलातील जीवन (Nature/Wild Life) तसेच ठाणे जिल्ह्यातील प्रकाशचित्रकारांसाठी विषय खुला (Open) आहे.

या वर्षीपासून पर्यावरणाचा विचार करता ही स्पर्धा ऑन लाईन (On Line) करण्यात आली आहे. स्पर्धेच्या प्रवेशिका १९ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०१४ रोजी रात्रौ ११.५९ वाजेपर्यंत **www.fotocirclesociety.com/aavishkar.php** या संकेत स्थळावर जाऊन ऑन लाईन पाठविता येतील.

दि. ११ व १२ ऑक्टोबर २०१४ रोजी स्पर्धेसाठी प्राप्त झालेल्या प्रकाशचित्रांचे परिक्षण करुन दि. ४ ते ९ नोव्हेंबर २०१४ या कालावधीमध्ये त्यातील निवडक प्रकाशचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे.

ही स्पर्धा केवळ महाराष्ट्रातील निवासी प्रकाशचित्रकारांसाठी मर्यादित आहे. स्पर्धेची नियमावली संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

अधिक माहितीसाठी फोटो सर्कल सोसायटी ९७०२ ५५२२३३, संजय नाईक ९७०२ ५८५८५८ / ९८६९७१४४५५, वेदिका भार्गवे ९८१९ ९७७९०८ यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन ठाणे महानगरपालिका व फोटो सर्कल सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे.

धन्यवाद!

**वेदिका भार्गवे**
सरचिटणीस
फोटो सर्कल सोसायटी